I.O.

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** सातारा    **P.S.(ठाणे):** सातारा शहर    **Year (वर्ष):** 2022

**FIR No.**(प्रथम खबर क्र.): 0475    **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 04/06/2022 01:46 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** शुक्रवार    **Date From (दिनांक पासून):** 03/06/2022

**Time Period (कालावधी):** पहर 6    **Date To ( दिनांक पर्यंत):** 03/06/2022

**Time From (वेळेपासून):** 17:40 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 17:40 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 04/06/2022    **Time (वेळ):** 01:10 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

**Entry No. (नोंद क्र.):** 004    **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 04/06/2022 01:46 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** दक्षिण, 0.500 किमी

**Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** सातारा नगरपरिषदेच्या शेजारी, स्वाद वडापावचे गाड्यावर,सातारा

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** आप्पासो रामराव जाधव

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1960    (d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**    **Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | 1035, प्लट नं 8,शनिवार पेठ,आदालत वाडा रोड,सातारा,सातारा शहर,सातारा,महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्थायी पता | 1035, प्लट नं 8,शनिवार पेठ,आदालत वाडा रोड,सातारा,सातारा शहर,सातारा,महाराष्ट्र, भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | प्रदिप शंकरराव कदम | | | 1. 186 रामाच गोठ,सातारा,सातारा शहर, सातारा,महाराष्ट्र,भारत |
| 2 | विनायक विलास गोडबोले | | | 1. 165 /6 साईरत्न अपार्टमेंट,प्लट नं 10 शाहुनगर ,सातारा,सातारा शहर, सातारा,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11 **Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

खबरी जबाब दिनांक 04/06/2022मी, आप्पासो रामराव जाधव, वय 62 वर्षे, शिक्षण - बी कम व्यवसाय - शेती, रा.1035, प्लट नं. 8, शनिवार पेठ, आदालत वाडा रोड सातारा मोबाईल नंबर 9822374822समक्ष सातारा शहर पोलीस स्टेशन येथे हजर राहुन खबरी जबाब देतो की, मी वरील ठिकाणी माझ्या कुटूंबासह राहणेस आहे. मी सातारा नगरपरिषद सातारा येथील सन 2021-2022 या आर्थिक वर्षाची घरपट्टी व पाणी पट्टी दिनांक 25/11/2021 रोजी भरलेली होती. सातारा नगरपरिषदेचे हद्दीतील मिळकतीचे घरपट्टी ची दर चार वर्षाने शासनाचे नियमाप्रमाणे नव्याने कर आकारणी केली जाते. त्याबाबत सातारा नगरपरिषद येथील लिपीक कदम व शिपाई कुलकर्णी यांनी माझ्या मिळकतीमध्ये येवुन पहाणी करुन गेले. त्यानंतर मागील आठवडयामध्ये शिपाई कुलकर्णी हे माझ्या घरी येवुन मला, तुमच्या घराची नव्याने कर आकारणी करणार असुन तुमच्या दोन खोल्या भाडयाने आहेत त्यामुळे तुम्हाला जादा कर भरावा लागेल असे मला सांगितले. त्यावेळी मी त्यांना शासनाचे नियमाप्रमाणे जो काय कर असेल तो मी भरतो, पण माझ्या खोल्या वर्षभर भाडयाने जात नाही त्या मी माझ्या साठीच वापरतो असे सांगितले. त्यावेळी शिपाई कुलकर्णी यांनी, तुम्ही तुमच्या खोल्या भाडयाने द्या अगर देवु नका आम्ही त्या भाडयाने दिल्या असेच दाखविणार आहे, जर तसे दाखवायचे नसेल तर तुम्ही मला 5-6 हजार रुपये द्या मी तुमच्या खोल्या भाडयाने आहेत हे दाखवत नाही म्हणजे तुम्हाला कर कमी लागेल असे म्हणाले. त्यावेळी मी त्यांना नाईलाजाने हो म्हणालो.त्यानंतर मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग सातारा कार्यालयात हजर राहुन सातारा नगरपरिषद सातारा येथील कर विभागातील लिपीक कदम व शिपाई कुलकर्णी हे शासनाचे नियमाप्रमाणे घरपट्टीची नविन कर आकारणी करणेसाठी व त्यामध्ये सवलत देण्याकरीता मला 5-6 हजार रुपयांची लाच मागणी केली असुन त्यांचे मागणीप्रमाणे मी त्यांना 5-6 हजार रुपये नेवुन देणार आहे. तरी त्यांचेवर कायदेशीर कारवाई कारवाई व्हावी याबाबतचा तक्रारी अर्ज मी पो.नि. पवार साहेब यांचेकडे दिला. त्यानंतर पो. नि. पवार साहेब यांनी तात्काळ मा.शिक्षणाधिकारी, (माध्यमिक विभाग) सातारा जिल्हा परिषद सातारा या कार्यालयातील 1) गणेश बाळु कोळी, वरिष्ठ सहायक 2) जितेंद्र सोनाजी जाधव, कनिष्ठ सहायक व यांची पंच म्हणुन सेवा उपलब्ध करुन घेतली. त्यांनतर पो.नि. पवार साहेब यांनी दोन पंचासह व सापळा पथकाची ओळख करुन दिली. मी आज दिनांक 03/06/2022 रोजी पो.नि. पवार साहेब यांचेकडे हजर केलेला तक्रारी अर्जाचे त्यांनी व दोन्ही पंचांनी वाचन केले. त्यानंतर माझ्या तक्रारीप्रमाणे माझ्याकडे लाच मागणी झाली अगर कसे? याची पडताळणी करण्यासाठी पंच नं.1 म्हणुन गणेश कोळी व पंच नं.2 म्हणुन जितेंद्र जाधव यांनी काम करण्याचे पवार साहेबांनी ठरवुन माझ्या तक्रारी अर्जावर व

सहकागदपत्रांवर पवार साहेब व दोन्ही पंचांनी सह्या केल्या.त्यानंतर पवार साहेब यांनी, मला व पंच नं.1 यांना सुचना देवुन व्हाईस रेकर्डर चालु करुन तो माझ्या शर्टचे आतील बाजुस लेसच्या सहायाने अडकवुन मला व पंच नं.1 यांना माझेकडील चारचाकी वाहन बलेनो क्रमांक एम एच 11 सी डब्ल्यु 3010 मधुन सातारा नगरपरिषद सातारा येथे भेट घेण्यासाठी रवाना करुन पडताळणी केली असता, प्रथम पडताळणी कारवाईमध्ये माझी व शिपाई कुलकर्णी यांची भेट झाली नाही परंतु मी, माझ्या फोन वरुन शिपाई कुलकर्णी यांना फोन केला. त्यावेळी फोनवर झालेल्या संभाषणामध्ये शिपाई कुलकर्णी यांनी माझ्या घराचे शासनाचे नियमानुसार घरपट्टीची नवीन कर आकरणेसाठी व त्यामध्ये सवलत देण्यासाठी माझ्याकडे, लिपीक कदम व स्वत:साठी 5000/- लाच मागणी करुन ती लाच रक्कम स्विकारण्याची तयारी दर्शविली.त्यानंतर आयोजित केले व्दितीय पडतळणीमध्ये माझी व नगरपरिषद सातारा येथील लिपीक कदम यांची सातारा नगरपरिषद सातारा येथे समक्ष भेट झाली. त्यावेळी माझी व लिपीक कदम यांचेमध्ये माझे कामाबाबत चर्चा झाली. त्यावेळी लिपीक कदम यांनी माझ्या घराचे शासनाचे नियमानुसार घरपट्टीची नवीन कर आकरणेसाठी व त्यामध्ये सवलत देण्यासाठी माझ्याकडे, शिपाई कुलकर्णी व स्वत:साठी 5000/- लाच मागणी करुन ती लाच रक्कम लागलीच सातारा नगरपरिषद सातारा येथे स्विकारण्याची तयारी दर्शविली. तसेच सदर पडताळणीमध्ये लिपीक कदम यांचेकडुन शिपाई कुलकर्णी यांचे नाव गोडबोले असल्याचे मला व पंच नं. 1 यांना समजले असल्याचे रेकर्ड झालेल्या संभाषणावरुन व माझ्या तसेच पंच नं.1 यांचे हकिकतीवरुन पो. नि. पवार साहेबांची व दोन्ही पंचांची खात्री झाली.त्यानंतर पवार साहेब यांचे सुचनेनुसार मी 5,000/- रुपये हजर केले. त्या नोटांचे क्रमांक एका कोऱ्या कागदावर लिहुन ठेवुन त्या लाच रकमेस अंथ्रासिन पावडर लावणे बाबतची कारवाई एसीबी कार्यालयात केली. सापळा कारवाई संबंधाने पवार साहेब यांनी मला व दोन्ही पंचांना तसेच सापळा पथकास आवश्यक त्या सर्व सुचना दिल्या. त्यानंतर माझ्या शर्टचे आतील बाजुस लेसच्या सहायाने व्हाईस रेकर्डर चालु करुन अडकवुन पंच नं.1 यांना माझ्या सोबत माझ्याकडील चारचाकी वाहनातुन लिपीक कदम व शिपाई गोडबोले यांची भेट घेण्याकामी सातारा नगरपरिषद सातारा येथे रवाना केले. मी व पंच नं. 1 कोळी असे माझ्याकडील चारचाकी वाहनातुन नगरपरिषद सातारा कार्यालय या ठिकाणी गेलो. तेथे गेल्यानंतर मी चारचाकी व्राहन नगरपालिका कार्यालयाचे पाठीमागील गेटचे बाजुस पार्क केले. त्यानंतर आम्ही नगरपरिषदेच्या हलचे बाहेरील बाजुस थांबलो. आमच्या पाठोपाठ आपण देखील आपलेकडील शासकिय वाहनाने आलात व वाहनातुन उतरुन कार्यालयाचे आजुबाजुस थांबुन राहीलात. त्यावेळी मी माझ्या मोबाईलचा स्पिकर ऑन करुन लिपिक मदतनीस कदम यांना फोन लावुन कार्यालयाचे खाली आल्याचे सांगितले. त्यावेळी लिपिक मदतनीस कदम येतो असे म्हणाले. त्यानंतर मी, शिपाई गोडबोले यांना मोबाईलचा स्पिकर ऑन करुन फोन केला व नगरपरिषदेच्या कन्टीनपाशी आलो असल्याचे सांगुन त्याठिकाणी येण्यास सांगितले. त्यानंतर काही वेळाने लिपिक मदतनीस कदम हे माझ्याजवळ आले. त्यावेळी मी, लिपिक मदतनीस कदम यांना या की असे म्हणालो, त्यावेळी लिपिक कदम हे तिकडे जावु, चहा घ्यायचा का असे म्हणाले. त्यावर मी, घेवु की असे म्हणालो. त्यावर मी, लिपीक मदतनीस कदम व पंच नं. 1 कोळी असे चालत चालत नगरपरिषदेचे बाजुस असलेल्या स्वाद वडापावचे गाडयावर गेलो. त्या ठिकाणी माझ्यात व लिपिक मदतनीस कदम यांचेत माझ्या कामाबाबत चर्चा झाली. त्यावेळी आमचेत चर्चा चालु असताना मी, देवु का असे विचारले, त्यावर लिपिक मदतनीस कदम यांनी देवुन टाका की असे म्हणुन माझ्याकडे लाच मागणी केली. त्यावेळी मी माझ्या शर्टचे डावे बाजुचे खिशातील 5000/- रुपये लाच रक्कम उजव्या हाताने काढुन लिपिक मदतनीस कदम यांचेसमोर धरुन, मोजुन घ्या असे म्हणालो. त्यावर लिपिक मदतनीस कदम हे असु दया असे म्हणाले. त्यावर मी, नाय नाय मोजलेले बरे असे म्हणालो, त्यावर लिपिक मदतनीस कदम ओके असे म्हणुन त्यांनी ती लाच रक्कम उजव्या हाताने स्विकारुन दोन्ही हातानी मोजुन त्यांचे शर्टचे छातीवरील डावे बाजुचे खिशात ठेवली, त्यावेळी मी वडापावचे गाडयापासुन थोडे बाजुला येवुन लाच रक्कम स्विकारल्याचा पुर्व नियोजित इशारा केला. तो इशारा पाहुन पोनि. पवार यांनी, मला बाजुला थांबवुन पंच नं. 1 यांचेजवळ गेलात. त्यानंतर मी माझ्या मोबाईलवरुन शिपाई गोडबोले यांना संपर्क केला असता शिपाई गोडबोले हे आलो आलो असे म्हणाले. त्यानंतर काही वेळातच शिपाई गोडबोले माझ्याकडे येत असल्याचे मी पाहिले त्यावेळी मी, पंच नं. 1 यांना तो इसम शिपाई गोडबोले असल्याचे सांगितले. त्यानंतर माझ्यात व शिपाई गोडबोले यांचेत चर्चा झाली. त्यानंतर पो.नि. पवार साहेब हे पंच नं. 1 यांचेजवळ गेले. त्यानंतर पो.नि. पवार यांनी माझ्याकडील व्हाईस रेकर्डर काढुन घेवुन तो बंद केला व मला बाजुला थांबण्यास सांगितले. त्यानंतर पो.नि. पवार व पथक असे सर्वजण पंच नं. 1 यांचे जवळ गेलात. काही वेळाने पो.नि.पवार साहेबांनी मला शासकीय वाहनात बोलावुन माझी अल्ट्रा व्हायोलेट दिव्याचे प्रकाशात तपासणी केली असता माझ्या उजव्या हाताचे बोटांचे पेऱ्यास व तळहातास तसेच माझ्या शर्टचे छातीवरील डाव्या बाजुचे खिशाचे आतील बाजुस व कडांस अंथ्रासिन पावडरची निळसर चकाकी दिसुन आली. त्यावेळी पो.नि. पवार यांनी मला, लिपीक कदम यांचे पद लिपीक मदतनीस असल्याचे सांगुन तपासणीमध्ये त्यांचे दोन्ही हातांचे बोटांचे पेऱ्यास व तळहातास तसेच त्यांचे अंगातील शर्टचे पुढील बाजुचे डाव्या खिशाचे आतील भागास अंथ्रासिन पावडर लागली असल्याचे सांगितले.त्यानंतर पो.नि. पवार साहेब यांनी लिपीक मदतनीस कदम व शिपाई गोडबोले यांना ताब्यात घेवुन सर्व पथकासह शासकिय वाहनाने तसेच मी माझ्याकडील चारचाकी वाहनाने सातारा नगरपरिषद सातारा येथुन निघुन एसीबी कार्यालय सातारा येथे दाखल झालो. त्यावेळी पो.नि. पवार साहेबांनी मला कार्यालयाचे बाहेर थांबण्यास सांगितले. काही वेळाने पो.नि. पवार साहेबांनी मला, एसीबी कार्यालयात बोलावुन घेवुन पंचांसमक्ष माझी अंगझडती घेतली. त्यानंतर पो.नि. पवार साहेबांनी, माझे व पंच नं.1 कोळी यांचे सांगणेप्रमाणे संभाषणाचे स्क्रिप्ट मधील नामोल्लेख केला. त्यानंतर मला पुन्हा कार्यालयाचे बाहेर थांबण्यास सांगितले. त्यानंतर काही वेळाने पुन्हा कार्यालयात बोलावुन घेवुन मला हकिकत विचारली त्यावेळी मी पंच नं.1 यांचेप्रमाणे हकिकत सांगितली. सदर बाबत सविस्तर यशस्वी पंचनामा न्टी करप्शन कार्यालय सातारा येथे टंकलिखीत करुन पुर्ण केला आहे. मी दिलेल्या तक्रारीचे अनुषंगाने दिनांक 03/06/2022 रोजी पडताळणी व सापळा कारवाईवेळी लोकसेवक प्रदिप शंकरराव कदम, वय 55 वर्षे, लिपीक मदतनीस, व विनायक विलास गोडबोले, शिपाई, सातारा नगरपरिषद सातारा नगरविकास खाते यांनी माझ्याकडे, माझ्या घराचे शासनाचे नियमानुसार घरपट्टीची नवीन कर आकारण्यासाठी व त्यामध्ये सवलत देण्यासाठी माझ्याकडे 5000/- लाच मागणी करुन ती लाच रक्कम लोकसेवक प्रदिप शंकरराव कदम यांनी दिनांक 03/06/2022 रोजी सापळा कारवाईमध्ये नगरपरिषदेचे शेजारी स्वाद वडापावचे गाडयावर 17.40 वाजण्याचे सुमारास स्विकारली म्हणुन माझी त्यांचे विरुध्द तक्रार आहे. माझा वरील खबरी जबाब माझे सांगणेप्रमाणे टंकलिखीत केला असुन तो मी वाचुन पाहिला तो माझे सांगणेप्रमाणे बरोबर व खरा आहे. हा खबरी जबाब दिला

**13.Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**
(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation: (**प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम/ हाती घेतले**):** BAGHWAN BABANRAO NIMBALKAR(I (Inspector)) **or (**किंवा**)** DGPBBNH6502

(2) **Directed (Name of I.O.) (**तपास अधिका-याचे नाव**):**
**Rank (**पद**):**
**No.(**क्र.**):** **to take up the Investigation (**ला तपास करण्याचे अधिकार दिले**) or (**किंवा**)**

(3) **Refused investigation due to (**ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला**):**

**or (**ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला**)**

(4) **Transferred to P.S.(**गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव**):**
**District (**जिल्हा**):**
**on point of jurisdiction (**को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित**) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (**प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.**)**

**R.O.A.C.(**आर. ओ .ए .सी.**)**

**14.Signature/Thumb impression of the complainant / informant.(**तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा**):**

**15.Date and time of dispatch to the court (**न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ**):**

**Signature of Officer in charge, Police Station (**ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name (**नाव**):** BAGHWAN BABANRAO
**Rank(**पद**):** I (Inspector)
**No.(**सं.**):** DGPBBNH6502

पो. स्टे. ऑफिसर
सातारा शहर पो. स्टे